# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./१०३९/२०२२ दि. २८/०३/२०२२

## परिपत्रक

विषय :- महाडीबीटी पोर्टलवरील विद्यापीठे / संस्था / महाविद्यालये यांनी त्यांचे बँक खाते अद्ययावत करणेबाबत तसेच सदरहू बँक खातेचा ताळमेळ घेणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०२१-२२/ शिष्यवृत्ती/ १२४७०, दि. ११/०३/२०२२

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे महाडीबीटी पोर्टलवरुन अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू पोर्टलवर विद्यापीठे / संस्था/ महाविद्यालये यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणे आवश्यक आहे.

विद्यापीठे तसेच महाविद्यालयांना त्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील खाते क्रमांक अद्ययावत असल्याची खात्री करणेबाबत तसेच त्यामध्ये सुधारणा असल्यास संदर्भिय पत्रामध्ये नमुद केल्यानुसार तात्काळ कार्यवाही करणेबाबत व बँक खाती जमा होणाऱ्या शिष्यवृत्ती रक्कमा बरोबर असल्याची खातरजमा करुन सदरहू बँक खातेचा दरमहा ताळमेळ घेण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय पत्राचे अवालोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

24.3.2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
४. मा. विभाग प्रमुख (सर्व), गोंडवाना विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग यांना कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र.........दि.........
जावक क्र.........दि.........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 2856 दि. 21/3/22

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्रमांक-उशिसं-२०२१-२२/ शिष्यवृत्ती/ 1२४७० दिनांक- १०.०३.२०२२.

11 MAR 2022

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

२. कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय- महाडीबीटी पोर्टलवरील विद्यापीठे/ संस्था / महाविद्यालये यांनी त्यांचे बँक खाते अद्ययावत करणेबाबत तसेच सदरहू बँक खातेचा ताळमेळ घेणेबाबत.**

संदर्भ- १. माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्र. GAD-मातंस-२०१८/C.R. १३८/S. १/३९, दि. १२ ऑक्टोंबर, २०१८

२. संचालनालयाचे पत्र क्र-उशिसं-शिष्य/२०२१/डिबीटी/१००४५,दि.०८.०९.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये, राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रिपणे महाडीबीटी पोर्टलवरुन अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू पोर्टलवर विद्यापीठे /संस्था /महाविद्यालये यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाडीबीटी पोर्टलमध्ये विद्यापीठे /संस्था /महाविद्यालये यांनी त्यांचे बँक खाते क्रमांक अचूक नमुद करणे आवश्यक आहे. विविध विभागाच्या शिष्यवृत्ती रक्कमा महाविद्यालयाच्या खातेवर जमा होत असतात.

याबाबत संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये, ज्या विद्यापीठे /संस्था /महाविद्यालये यांना त्यांचे शिष्यवृत्ती बँक खाते क्रमांक बदल / दुरुस्ती करावयाची आहे, त्यांनी महाडीबीटी पोर्टलवरील प्राचार्य लॉगीनमध्ये उपलब्ध असलेल्या Update Bank Account या पर्यायाचा वापर करुन आपले खाते क्रमांकामध्ये सुधारणा करावी. तसेच त्यासोबत खाते क्रमांक बदलाबाबतच्या कारणांच्या तपशिलासह प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे पत्र व महाविद्यालयाचे नाव नमुद असलेले खाते क्रमांक धनादेश / बँक स्टेटमेंट यांची छायांकित प्रत जोडणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी याबाबत आपल्या अधिनस्त असलेले विद्यापीठे तसेच महाविद्यालयांना त्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील खाते क्रमांक अद्ययावत असल्याची खात्री करणेबाबत तसेच त्यामध्ये काही सुधारणा असल्यास वर नमुद केल्यानुसार तात्काळ कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात याव्यात.

तसेच विद्यापीठे / संस्था / महाविद्यालये यांच्या बँक खाती जमा होणाऱ्या शिष्यवृत्ती रक्कमा बरोबर असल्याची खातरजमा करण्यात यावी. तसेच सदरहू बँक खातेचा दरमहा ताळमेळ घेण्यात यावा. याबाबत काही समस्या उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, संस्थाचे संचालक तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

प्रत :- प्राचार्य, सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

DR(Establishment) / FAO for n.a.

13/3

Dr. Deshmukh (AR)
Pls. issue circular.
22.3.2022

श्री सोनपराम
22.03.2022